## मेट्रोचे छत्रपती संभाजी राजे उद्यान स्थानक व डेक्कन जिमखाना स्थानक यांना पादचारी पुलाद्वारे पेठ भागांशी जोडणार



पुणे , ११ जुलै २०१९ : पुणे मेट्रोच्या वनाज ते रामवाडी या मार्गिकेमध्ये डेक्कन व संभाजी उद्यान हि दोन महत्वाची मेट्रो स्थानके आहेत. डेक्कन स्थानक हे डेक्कन पीएमपीएमएल बस स्थानकाच्या जवळ नदी किनारी असून कर्वे रस्ता, खंडोजी बाबा चौक , फर्ग्युसन कॉलेज रस्ता ,आपटे रस्ता, व जंगली महाराज रॊड पासून जवळ असल्यामुळे या परिसरातील लोकांना त्याचा फायदा होणार आहे. या डेक्कन स्थानका चा अधिका अधिक लोकांना लाभ करून देण्यासाठी नदीवर पादचारी पूल बांधून नारायण पेठेचा भाग देखील जोडण्यात येणार आहे. तसेच अलका चित्रपटगृह चौक, टिळक चौक, न.चि. केळकर मार्ग जवळील परिसर डेक्कन मेट्रो स्टेशनला जोडला जाईल.

पुणे मेट्रोचे संभाजीनगर मेट्रो स्थानक संभाजी उद्यानाच्या नदीपात्राच्या बाजूला बांधण्यात येणार आहे. जंगली महाराज रस्ता, बालगंधर्व रंगमंदिर, आपटे रॊड या अंत्यत गजबजीच्या भागाला हे मेट्रो स्थानक

सुविधा पुरवेल. संभाजी उद्यान मेट्रो स्थानक शहराच्या जुन्या पेठ भागाला जोडण्यासाठी नदीवर पादचारी पूल बांधण्यात येणार आहे. जेणेकरून ओंकारेश्वर मंदिर चौक, वर्तक उद्यान व शनिवार पेठ या जुन्या पेठ वस्तीच्या भागांना जोडण्यात येणार आहे.

हे दोन्ही पादचारी पूल केबल स्टेड ब्रिज या तंत्रज्ञानावर आधारित असून नदीपात्रात एकही खांब उभारावा लागणार नाही. यामुळे पर्यावरणाला कोणतीही हानी पोहोचणार नाही. पुणे शहराचा सांस्कृतिक वारसा असलेले बालगंधर्व रंगमंदिर यांच्यापासून प्रेरणा घेऊन या पुलाचे बांधकाम वीणा वाद्यसदृश्य आकाराचे करण्यात येणार आहे. मेट्रोची सुविधा जास्तीत जास्त लोकांना पुरवण्यासाठी महामेट्रो बांधील असून या अनुषंगाने या दोन्ही पादचारी पुलांची निर्मिती करण्यात येणार आहे जेणेकरून पुणे शहराचा अंत्यत महत्वाचा जुना आणि पेठांचा भाग मेट्रो स्टेशनांशी जोडला जाईल .

याव्यतिरिक्त डेक्कन व संभाजी उद्यान मेट्रो स्थानके एकमेकांना पादचारी रस्त्याद्वारे (पूल) जोडले जाणार आहे. हा रस्ता मेट्रोच्या मुख्य उन्नत मार्गिकेच्या खाली उभारण्यात येणार आहे. एकाप्रकारे द्विस्तरीय पूल बांधण्यात येणार आहे . सर्वात वरील स्तरावरून मेट्रोची मार्गिका असेल व खालील स्तर हा पादचाऱ्यांना वापरासाठी असेल. तसेच यामुळे नदी परिसराचे मेट्रोचे विहंगमदृश्य बघता येइल. जेष्ठ नागरिक, पर्यटक, विद्यार्थी इत्यादींना विरुंगुळ्यासाठी एक चांगली जागा उपलब्ध होईल. ह्या मेट्रो मार्गिकेखालील लांबच लांब पूल थेट डेक्कन मेट्रो स्थानक ते संभाजी उद्यान स्थानक इतक्या लांबीचा असेल व त्याचा वापर करण्यासाठी कुठलेही तिकीट घ्यावे लागणार नाही. महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी म्हटले आहे कि डेक्कन मेट्रो स्थानक व संभाजी उद्यान स्थानक यांना जोडणारे पादचारी पूल व दोन्ही स्थानकांना जोडणारा पूल यामुळे या परिसराचा कायापालट होणार आहे .

**PROPOSED PEDESTRIAN BRIDGE 1:**

Location:

East End – Elevated Walkway connecting to Deccan Metro Station

West End –Riverside Road Adjoining NC Kelkar Road

**PROPOSED PEDESTRIAN BRIDGE 2:**

Location:

East End – Elevated Walkway connecting to Sambhaji Park Metro Station

West End –Riverside Road Vartak Garden

Prime Landmarks:

Balgandharv Rangmandir, Chatrapati Sambhaji Park, Ashtabhuja Devi Temple, Onkareshwar Temple, Deccan,etc

## Design Concept:

- Pune is considered as a cultural capital of Maharashtra.
- Renowned for its rich Art & Culture.
- Major Educational hub due to the presence of numerous educational institutions
- **Proposed theme : Indian Classical Instrument Tanpura.**
- Used the opportunity of the shape of Tanpura to derive the profile of bridge.

## DESIGN CONCEPT

2

- Pune is considered as a **cultural capital** of Maharashtra.
- Renowned for its rich Art & Culture.
- Major Educational hub due to the presence of numerous educational institutions


- **Proposed theme : Indian Classical Instrument Tanpura.**
- Used the opportunity of the shape of Tanpura to derive the profile of bridge.



Image depicting artists performing classical music from the Marathi movie biopic on Balgandharv's life.




**BAL GANDHARV**
NARAYAN SHRIPAD RAJHANS





Tanpura was primely used in the musical performances during Balgandharv's era.



- **Proposed Amphitheatre** :
- Will bring life & activity to the bridge & attract more visitors and social gatherings.
- Amphitheatre will compliment the rich cultural heritage of the place.
- Will become a center of art workshops, Performing arts center, exhibiton place for upcoming artists, leisure sit-out place & excellent viewing deck of the river Mutha.




**BAL GANDHARV RANGMANDIR**

- Auditorium & Exhibition Hall
- Cultural Center of theatre, classical music, art exhibitions, etc
- In close vicinity of Proposed Sambhaji Park Metro station.

## 3D IMAGES – FOOT OVER BRIDGE AT DECCAN METRO STATION – REVISED AS PER

5

